# ४. रोटरी माहिती

## रोटरी इंटरनॅशनल

उद्योगधंद्यांत प्रसिद्धी मिळविलेल्या व्यक्तींनी विविध क्षेत्रांत, समाजाची सेवा करावी व अशी सेवा करणाऱ्यांना प्रोत्साहन द्यावे म्हणून स्थापलेली एक आंतरराष्ट्रीय नागरी संस्था. भूतदया, मानवतावादी व शैक्षणिक प्रकल्प यांच्या माध्यमातून विविध राष्ट्रांतील नागरिकांमध्ये सामंजस्य व मैत्री यांची जोपासना वृद्धिंगत व्हावी, हा रोटरी संस्थेचा मुख्य उद्देश मानला जातो.

प्रारंभी वेगवेगळ्या सभासदांच्या कचेऱ्यांत (कार्यालयांत) अगर निवासस्थानी आळीपाळीने क्लबची बैठकभरत असे; त्यावरून या क्लबला 'रोटरी' म्हणजे 'फिरता' क्लब असे नाव पडले. पहिला रोटरी क्लब २३ फेब्रुवारी १९०५ रोजी शिकागो येथे पॉल पर्सी हॅरिस या वकिलाने स्थापिला. त्यानंतर १९१० मध्ये 'द नॅशनल असोसिएशन ऑफ रोटरी क्लब्ज' ही संघटना स्थापन झाली. पुढे कॅनडा आयर्लंड, ग्रेट ब्रिटन इ. देशात क्लबाच्या शाखा निघाल्या आणि १९१२ मध्ये क्लबाचे नाव 'इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ रोटरी क्लब्ज' (आंतरराष्ट्रीय रोटरी संघटना) असे ठेवण्यात आले.

१९२२ मध्ये पुन्हा त्याचे नाव बदलून सांप्रतचे 'रोटरी इंटरनॅशनल' असे ठेवण्यात आले. संस्थेचे जागतिक मुख्यालय अमेरिकेच्या इलिनॉय